दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक ३०० वा शुक्रवार दि.१० मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# जिल्ह्यातील १४४ प्रकल्पांत फक्त ५.५४ टक्के पाणीसाठा



लातूर : प्रतिनिधी–गेल्या पंधरा–वीस दिवसांपासून लातूर जिल्ह्यासह परिसरातील जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट आहे. प्रचंड ऊन असल्यामुळे प्रकल्पांतील पाणीसाठ्याचे भाष्पीभवनाचा वेग वाढला आहे. अधिच जेमतेम पाणीसाठा असलेल्या प्रकल्पांमधील पाण्याचे भाष्पीभवन वेगाने होत असल्यामुळे प्रकल्पांतील पाण्याची पातळी तितक्याच वेगाने कमी होत चालली आहे. जिल्ह्यात दोन मोठे, आठ मध्यम तर १३४ लघू असे एकुण १४४ प्रकल्पांमध्ये फक्त ५.५४ टक्के पाणीसाठा आहे. केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून लातूर शहरासह केज, धारुर, अंबाजोगाई, कळंब या मोठ्या शहरांना पाणीपुरवठा केला जातो. सद्य:स्थितीत मांजरा प्रकल्पात टक्त २.२३ टक्के जीवंत पाणीसाठा आहे. त्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने करावा लागणार आहे.
येत्या पावसाळ्यापर्यंत मांजरा प्रकल्पातील पाणी पुरविता यावे, यासाठी जिल्हा प्रशासनाने नियोजन केले आहे. या नियोजनाची अंमलबजावणी काटेकोर झाली तर पाणीटंचाई भासणार नाही, अशी सद्याची परिस्थिती आहे. लातूर शहराला पाणीपुरवठा होणा–या मांजरा धरणात आता अत्यल्प जीवंत पाणीसाठा राहिला आहे. सध्या लातूर शहराला पाच दिवसांआड पाणीपुरवठा केला जात आहे. गेल्या महिन्यापासून हा बदल करण्यात आला आहे. मांजरा प्रकल्पात २.२३ टक्के म्हणजेच ३.९४६ दशलक्ष घनमीटर जीवंत पाणीसाठा आहे. मृत आणि जीवंत पाणीसाठा मिळून ५१.०७६ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आहे. यातील ४७.१२३ दशलक्ष घनमीटर मृत पाणीसाठा आहे.
मांजरा व निम्न तेरणा या दोन मोठ्या प्रकल्पांत २.२६ टक्के, तावरजा, रेणापूर, व्हटी, तिरु, देवर्जन, साकोळ, घरणी आणि मसलगा या आठ मध्यम प्रकल्पांत ४.६६ टक्के, १३४ लघू प्रकल्पांत ८.६७ टक्के असे एकुण १४४ प्रकल्पांत फक्त ५.५४ टक्के पाणीसाठा आहे. पाण्याचा वापर काटकसरीने केला तर येत्या पावसाळ्यापर्यंत मांजरा प्रकल्पातील पाणी पुरु शकते. नागरिकांनी पाणी भारुन झाल्यानंतर नळाला तोटी लाववी, रस्त्यावर, गाड्या धुण्यासाठी पाण्याचा वापर करु नये, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. सध्या शहराला पाच दिवसांआड पाणीपुरवठा होतो. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून पाणीपुरवठा विभाग तत्पर आहे.

## ढोकी पोलिस ठाण्याच्या पथकाने पकडली कारसह ७ लाखांची दारू

धाराशिव : प्रतिनिधी तेर ता. धाराशिव येथे एका कारमधून लाखो रूपयेकिंमतीची देशी–विदेशी दारू अवैध विक्री करण्यासाठी येत असल्याची माहिती ढोकी पोलीसांना बुधवारी दि. ८ मे रोजी रात्री मिळाली होती. यावरून पोलीसांनी पाळत ठेवून कारची तपासणी केली असता त्यामध्ये लाखो रूपये किंमतीची दारू आढळून आली. यावेळी पोलिस पथकाने कारसह ७ लाखाची दारू जप्त केली आहे. आरोपी दिपक विठ्ठल नाईकवाडी रा. तेर याला अटक केली आहे. या प्रकरणी ढोकी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले की, कळंब ते ढोकी रस्त्यावरून एक सिल्वहर कलरची कार दारू घेऊन येत असल्याची माहिती ढोकी पोलिसांना मिळाली होती. ढोकी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक संतोष तिगोटे यांनी पोलिस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक व कळंबचे उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी रात्री साडेअकराच्या सुमारास सापळा लावला होता.यावेळी कार घेऊन तेर येथील दिपक नाईकवाडी आला. कारची तपासणी केली असता त्यामध्ये विविध कंपनीची देशी–विदेशी लाखो रूपये किंमतीची दारू दिसून आली. पोलीसांनी कारसह ६ लाख ९८ हजार ४१० रूपयेकिंमतीची दारू जप्त केली. या प्रकरणी तेर येथील दिपक विठ्ठल नाईकवाडी याच्या विरोधात ढोकी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलिस निरिक्षक संतोष तिगोटे, सहाय्यक फौजदार राजाभाऊ सातपुते, उत्रेश्वर गुंड, श्रीमंत क्षीरसागर, श्रीधर नांदे यांच्या पथकाने केली.

## आग प्रतिबंधक उपायोजना; फायर ऑडिट बंधनकारक



लातूर : प्रतिनिधी शासकीय, निमशासकीय कार्यालये, व्यापारी संकुल, दवाखाने, प्रतिष्ठाने, पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, शाळा, महाविद्यालये, अभ्सासिका, हॉटेल्स व रेस्टॉरंट, सांस्कृतिक सभागृह, औद्योगिक वसाहत, मंगल कार्यालये, कोल्ड स्टोरेज आदी ठिकाणी एक महिन्याच्या आत परिपुर्ण आग प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात आणि कागदपत्रांच्या पुर्ततेसह योग्यता प्रमाणपत्र घेण्यात यावे, त्यासाठी आठ दिवसांच्या आत फायर ऑडिट करण्यात यावे, असे निर्देश लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आले आहेत.आगीच्या घटनांना प्रतिबंध करता यावा, यासाठी इमारतीमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना करणे बंधनकारक करण्यात आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण १७ नूसार आग प्रतिबंधक उपाययोजना करणे क्रमप्राप्त आहे. कायद्याची अंमलबजावणी कायदा पारित झाल्याच्या दिनांकापासून करण्यात आली आहे. त्यानूसार लातूर शहरातील भोगवटाधारकांना निवासी इमारत व व्यापारी संकुल, निमशासकीय कार्यालये, शासकीय कार्यालये, रेस्टॉरंट, गोडाऊन, औद्योगिक वसाहत, सांस्कृतिक सभागृहांमध्ये करणे आवश्यक आहे.त्यामुळे व्यवसायिकांनी तात्काळ फायर ऑडिट तात्काळ फायर ऑडिट करुन घ्यावे. त्यानंतर एक महिन्याच्या आत परिपूर्ण आग प्रतिबंधक उपाययोजना करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेसह शुल्क भरुन योग्येतेच प्रमाणपत्र हस्तगत करुन घ्यावे. ज्यांच्याकडे योग्यता प्रमाणपत्र नाही त्यांच्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, असे महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा कार्यालयातून सांगण्यात आले.

## महाराष्ट्रात ड्रग्जचा सुळसुळाट



मुंबई : नाशिक ते लोणावळा पट्ट्यात अनेक ठिकाणी अमली पदार्थांचा पुरवठा करणा–या ठिकाणांची माहिती असतानाही त्याच्यावर कारवाई केली जात नाही. तेथे कारवाई न करण्याबाबत केंद्रातील कोणत्या मंत्र्याने सूचना दिल्या आहेत का, असा सवाल करत उपमुख्यमंत्री तथा राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला याची माहिती द्यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषदेत केली.१९९३ ला मुंबईत साखळी बॉम्बस्फोट झाले. त्यासाठी ड्रग्सचा पैसा वापरण्यात आला होता. त्यातूनच शस्त्र आणि दारूगोळा मुंबईत आला व बॉम्बस्फोट करण्यात आले. ड्रग्जचा व्यवहार हा एक संघटित गुन्हा असून त्याचा दहशतवादाशी संबंधित आहे. या ड्रग्जमधून जो पैसा मिळतो तो दहशतवादी कारवायांसाठी वापरला जातो. २०२१ मध्ये मुंद्रा पोर्टवर एनआयएमार्फत अमली पदार्थांचा मोठा साठा पकडण्यात आला. एनआयएने दाखल केलेल्या आरोपपत्रात ड्रग्सचा पैसा लष्कर–ए–तोयब्बा या दहशतवादी संघटनेसाठी पुरवला गेल्याचे म्हटले आहे. म्यानमार, थायलंडमधून मोठ्या प्रमाणात तस्करी होते.अरूणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, आणि त्रिपूरा या उत्तर पूर्व राज्यांमार्फत हे अमली पदार्थ भारतात आणले जातात. ही राज्ये गेल्या दहा वर्षांपासून भाजपशासित आहेत. भाजपाचे सरकार असतानाही ड्रग्जच्या व्यवहारांवर कारवाई होत नसल्याने शंका निर्माण झाल्या आहेत. पुणे–नाशिकच्या भागात अमली पदार्थ तस्करी करणारी रॅकेट असताना गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई का केली नाही, हे जनतेला सांगावे, अशी मागणी प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

## ठाकरे गटाचे अमोल किर्तीकर यांच्या प्रचार यात्रेत मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी

मुंबई : उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार अमोल किर्तीकर यांच्या प्रचार रॅलीत मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी इब्राहिम मुसा सहभागी झाल्याचा व्हिडिओ प्रसिद्ध करून भाजपने टीकेची झोड उठवली आहे. महाविकास आघाडीच्या लोकांनी राजकारणासाठी देशविरोधी लोकांशी हातमिळवणी केल्याचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.
लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात मुंबईत मतदान होणार असून प्रचार हळूहळू शिगेला जात आहे. मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघात महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे अमोल किर्तीकर व महायुतीकडून शिंदेंच्या शिवसेनेचे रवींद्र वायकर यांच्यात लढत होत आहे. अमोल किर्तीकर यांच्या प्रचार रॅलीत मुंबईत १९९३ सली झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी १० वर्षांची शिक्षा भोगून आलेला इब्राहिम मुसा सहभागी झाल्याचा आरोप भाजपाने केला होतं. याचा एक व्हिडिओ ही प्रसारित करण्यात आला होता. बॉम्बस्फोटासाठी इब्राहिम मुसाने हत्यारे पुरवल्याचा आरोप होता. कोर्टाने त्याला दहा वर्षांची सुनावली होती.
यावरुन भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार टीका केली. इंडिया आघाडी मतांच्या लांगुलचालना करता उज्वल निकम यांचा विरोध करत कसाबचे महात्म्य गात आहे. दुसरीकडे बॉम्बब्लास्टचा आरोपी त्यांच्या प्रचारात दिसतोय त्यामुळे देशविरोधी लोकांशी ठाकरे गटाने, काँग्रेसने आणि शरद पवारांच्या पक्षाने हातमिळवणी केली आहे हे स्पष्ट दिसत आहे असा आरोप फडणवीस यांनी केला. तर भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांची मशाल दहशतवाद्यांच्या हाती असल्याचा आरोप केला. उद्धव ठाकरे सरकारमध्ये असताना याकूबच्या कबरीचे सुशोभीकरण, टीपू सुलतान, औरंगजेबाचा उदो उदो झाला आणि आता थेट मुंबईकरांचा जीव घेणा–या आरोपीकडून उबाठा गटाचा प्रचार केला जात आहे. वंदनीय बाळासाहेबांच्या आत्म्याला काय वाटत असेल? अशी टीका त्यांनी केली.

## पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो




शिरुर : दिलीपराव वळसे पाटलांचा शपथविधी झाला की, याची सटकली. हा म्हणाला दादांनी याला मंत्रीमंडळात घ्यायला नको होते. आता आपले काही जमणार नाही. त्यांच्या डाव्या आणि उजव्या बाजूला बसलेल्या आमदारांना त्यांनी सांगितले. मला त्या आमदारांनी घरी आल्या आल्या सांगितले की, ते असे म्हणत होता आणि नंतर तो तिकडे गेला. त्याला गाजर दाखवण्यात आले आहे. त्याला साहेबांनी सांगितले की, पुढच्या वेळेस तुच मंत्री होणार आहे.
आता पुढच्या वेळेस मंत्री होण्यासाठी त्याने कारखान्याची वाट लावली, बाकीच्या सगळ्यांची वाट लावली. आता मंत्री व्हायला निघालायस, पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिरुरचे आमदार अशोक पवार यांना आव्हान दिले आहे. महायुतीचे उमेदवार शिवाजी आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ अजित पवार यांनी सभा घेतली. यावेळी ते बोलत होते.
अजित पवार म्हणाले, घोडगंगा कारखाना अडचणीत आहे. त्यातून मार्ग काढता येऊ शकेल. मात्र संचालक मंडळ एकत्रित हवे. अमोल कोल्हे सेलिब्रेटी आहेत असे सांगून पाच वर्षांत लोकांकडे गेले नाहीत. तुमचे प्रश्न केंद्र आणि राज्य सरकार एकत्रित सोडवू शकते. शरद पवारांनी शिरुरचे आमदार अशोक पवार यांना मंत्रिपदाचे गाजर दाखवले आहे, त्यामुळे ते आपल्यासोबत आले नाहीत. अजित पवाराने जर ठरवले तर एखाद्याला आमदार नाही म्हणजे नाही होऊ देत. तुझी औकात काय आहे? असे म्हणत अजित पवारांनी अशोक पवारांना दम देण्याचा प्रयत्न केला आहे.

## चिरंजीवीला पद्मविभूषण तर होर्मुसजी एन कामा यांना पद्मभूषण

नवी दिल्ली : दिल्लीतील राष्ट्रपती भवनात नागरी गुंतवणूक समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कला क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेत्री वैजयंतीमाला बाली यांना पद्मविभूषण प्रदान केले. या व्यतिरीक्त अनेक मान्यवरांना आज पुरस्कार देण्यात आले. कला क्षेत्रातील कोनिदला चिरंजीवी यांना देखील पद्मविभूषण प्रदान केले.
तसेच माध्यमातील दिग्गज होर्मुसजी एन कामा यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना साहित्य आणि शिक्षण–पत्रकारिता या क्षेत्रातील पुरस्कार मिळाला आहे. सार्वजनिक व्यवहार क्षेत्रात सत्यब्रत मुखर्जी (मरणोत्तर) यांना पद्मभूषण प्रदान केले. दिवंगत सत्यब्रत मुखर्जी यांचे पुत्र सुमेंद्र नाथ मुखर्जी यांना हा पुरस्कार मिळाला. शिल्पकार ए वेलू आनंदा चारी यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान केला. हिंदुस्तानी शास्त्रीय गायक सोम दत्त बट्टू यांना पद्मश्री, सत्यनारायण बेलेरी यांना कृषी क्षेत्रातील पद्मश्री प्रदान केले. क्रीडा क्षेत्रातील जोश्ना चिनप्पा यांना पद्मश्री प्रदान करण्यात आला.
अंदमान आणि निकोबार बेटांचे शेतकरी, के चेल्लम्मल यांना कृषी क्षेत्रातील पद्मश्री पुरस्कार देण्यात आला. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील श्रीधर माकम कृष्णमूर्ती यांना पद्मश्री प्रदान केले. तसेच जॉर्डन लेपचा यांना कला क्षेत्रातील योगदानामुळे पद्मश्री पुरस्कार देण्यात आला.

## ७,४२,६८७ मतदारांनी मतदानाकडे फिरवली पाट



लातूर : प्रतिनिधी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर मतदारसंघात १९ लाख ७७ हजार ४२ मतदारांपैकी १२ लाख ३७ हजार ३५५ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला. त्यामुळे जिल्ह्यात ६२.५९ टक्के मतदान झाले. जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे, यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करुनही लातूर लोकसभा मतदारसंघातील ७ लाख ४२ हजार ६८७ मतदारांनी मतदानाकडे पाट फिरवली.
लातूर लोकसभा मतदारसंघ अंतर्गत येणा–या लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात ३ लाख २४ हजार ३०३ मतदारांपैकी २ लाख ११ हजार ७११ मतदारांनी म्हणजेच ६५.२८ टक्के मतदारांनी मतदान केले. लातूर शहर विधानसभा क्षेत्रातील ३ लाख ८४ हजार ९८० मतदारांपैकी ६०.७७ टक्के म्हणजेच २ लाख ३३ हजार ९३४ मतदारांनी आपला हक्क बजाविला. अहमदपूर विधानसभा क्षेत्रात ३ लाख ३८ हजार ६१४ मतदारांपैकी २ लाख १३ हजार ७२६ मतदारांनी (६२.१२ टक्के), उदगीर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात ३ लाख १२ हजार ८६५ पैकी १ लाख ९८ हजार ६२ मतदारांनी (६३.३१ टक्के), निलंगा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील ३ लाख २२ हजार ७२८ मतदारांपैकी २ लाख १४६ मतदारांनी (६२.०२ टक्के) आणि लोहा विधानसभा क्षेत्रातील २ लाख ९३ हजार ५५२ मतदारांपैकी १ लाख ७९ हजार ७७६ म्हणजेच ६१.२४ टक्के मतदारांनी मतदान केले.
मतदारसंघातील एकूण १० लाख ३५ हजार ३७६ पुरुष मतदारांपैकी ६ लाख ६४ हजार ६३० पुरुष मतदार (६४.१९ टक्के), ९ लाख १ हजार ६०५ महिला मतदारांपैकी ५ लाख ७२ हजार ७०० महिला मतदारांनी (६०.८२ टक्के) आणि ६१ तृतीयपंथी मतदारांपैकी २५ मतदारांनी (४०.९८ टक्के) आपला हक्क बजाविला. तर ७ लाख ४२ हजार ६८७ मतदारांनी मतदानाकडे पाट फिरवली.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# गयारामांच्या कर्मभूमीत

तीन अपक्ष आमदारांनी पाठिंबा काढून घेतल्याने हरयानात भाजप सरकार अल्पमतात गेले असले तरी ते कोसळण्याची शक्यता नाही. मात्र तेथील राजकीय समीकरणे बदलू शकतात.

भारतीय लोकशाही आणि राजकारणातील परिभाषेला ‘आयाराम–गयाराम’ हे खास विशेषण बहाल करणाऱ्या हरयाना राज्यातून ताजी बातमी आली आहे ती तीन अपक्ष आमदारांनी बदललेल्या भूमिकेची. या तिघांनी भारतीय जनता पक्षाच्या सरकारचा पाठिंबा काढून घेऊन काँग्रेसला पाठिंबा जाहीर केला आहे. ऐन लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत घडलेल्या या घटनेमुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.तीन अपक्षांनी पाठिंबा काढून घेतल्याने हरियाणातील भाजपचे नायब सैनी सरकार अल्पमतात आले असले तरी ते एवढ्यात कोसळण्याची शक्यता नाही. परंतु ही घटना राजकीय वारे कोणत्या दिशेने वाहू लागले आहे, याचे सूचन करणारी आहे.या तिघांनी दगा दिला म्हणून भाजपतून संताप व्यक्त होईलही; परंतु आता सगळीकडेच हे प्रकार इतके फोफावले आहेत, की कोणी कोणाकडे बोट दाखवायचे, असा प्रश्न आहे. अशाप्रकारचे ‘संगीत खुर्ची’चे वा ‘कोलांटउड्यां’चे खेळ आता नवीन राहिलेले नाहीत आणि भाजपनेदेखील त्यात अगदी मुक्तपणे भाग घेतलेला आहे.

हरयानात १९६७ मध्ये गयालाल नावाच्या आमदाराने पंधरा दिवसांत तीनदा पक्ष बदलला होता. तसे करून शेवटी जेव्हा ते मूळ पक्षात म्हणजे काँग्रेसमध्ये परतले, तेव्हा काँग्रेसनेते राव बीरेंद्रसिंह यांनी ‘गयाराम’ हे ‘आयाराम’ झाले, असे उद्गार काढले होते. तेव्हापासून हे शब्द रूढ झाले. राजकीय पक्षांनी ‘गयारामां’बद्दल संताप व्यक्त करायचा, पण ‘आयारामां’चे मात्र स्वागत करायचे, हा दुटप्पीपणाही त्यावेळेपासूनचा.

ताजी घटना ही अपक्षांबद्दलची असल्यामुळे प्रतिक्रियांचे स्वरूप कदाचित वेगळे असेल; पण प्रश्न आहे तो तत्त्वापेक्षा राजकीय सोय महत्त्वाची मानण्याचा. हरयानातील राजकारणाचे तेच झाले आहे. तेथील लोकसभेच्या दहा जागांसाठी प्रचार टिपेला पोहोचला असताना लोकसभा निवडणुकीवर या घटनेचा काही परिणाम होणेही स्वाभाविक आहे.घटनेचे राजकीय परिणाम दिल्ली, पंजाब आदी बाजूच्या राज्यांमध्येही होऊ शकतात.

भाजपला लोकसभा निवडणुकीत पैकीच्यापैकी जागा देणाऱ्या राज्यांमध्ये गुजरात, दिल्लीनंतर हरियाणाचा समावेश होतो. २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपने येथील दहापैकी दहा जागा जिंकल्या होत्या. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेली ‘चारशे पार’ची घोषणा प्रत्यक्षात आणावयाची तर गतवेळचे यश टिकवून नव्या ठिकाणी वाढीव जागा मिळवणे आवश्यक आहे.

यातील पहिला टप्पा आहे, तो गतवेळच्या जागा टिकवण्याचा आणि त्यादृष्टीने हरियानामध्ये भाजपसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. बारा महिने चोवीस तास इलेक्शन मोडवर असलेल्या भाजपकडून त्यासाठी सतत प्रयत्न सुरू असतात. त्यातून नवनवीन क्लृप्त्या लढवल्या जातात. नेतृत्वबदल करून प्रस्थापितविरोधी लाटेचा जोर कमी करणे, विद्यमान नव्या चेहऱ्यांना उमेदवारी देणे, अशा खेळी केल्या जातात.

दोन महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांचा राजीनामा घेऊन त्यांच्या जागी ओबीसी समाजघटकांमधील नायब सैनी यांच्याकडे मुख्यमंत्रिपद सोपवण्यात आले. आदल्या दिवशी नरेंद्र मोदी यांनी जाहीर सभेत खट्टर यांचे कौतुक केले, त्यांच्याशी असलेल्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला आणि दुसऱ्याच दिवशी त्यांचा राजीनामा घेण्यात आला.

दिल्लीच्या राजकारणात नरेंद्र मोदी यांची हवा सुरू झाल्यानंतर त्याचे परिणाम हरियाणातही उमटू लागले होते. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या या राज्यात २०१४ मध्ये भाजपने काँग्रेसची पुरती वाताहत केली. नव्वद जागांच्या विधानसभेत भाजपने अवघ्या चार जागांवरून ४७पर्यंत झेप घेतली. २०१९च्या विधानसभा निवडणुकीतही भाजपने यशाची पुनरावृत्ती केली; परंतु त्यावेळी स्वबळावर सत्ता मिळू शकली नाही.

सात जागांचे नुकसान सोसून भाजप चाळीसवर आला. काँग्रेसने पंधरा जागांवरून ३१ पर्यंत मजल मारली. दोन्ही प्रमुख पक्षांपैकी कुणालाही स्पष्ट बहुमत न मिळाल्याने दहा जागा मिळवणाऱ्या जननायक जनता पक्षाच्या दुष्यंत चौताला यांची भूमिका निर्णायक ठरली. त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाच्या बदल्यात भाजपला पाठिंबा दिल्याने भाजप पुन्हा सत्तेवर आला.

लोकसभेच्या २०२४च्या निवडणुकीची तयारी सुरू झाल्यानंतर जागावाटपावरून भाजप आणि जननायक जनता पक्षामध्ये मतभेद झाले. चौताला यांच्या पक्षाला दोन जागा देण्यास भाजप तयार झाला नाही, त्यामुळे त्यांनी पाठिंबा काढून घेतला. अपक्षांमुळे सरकार तरले.

भाजपने खट्टर यांच्याजागी नायब सैनी यांना मुख्यमंत्री केले, त्या घटनेला दोन महिने होत आले असताना तीन अपक्षांनी पाठिंबा काढून घेतला, परंतु सैनी यांनी सत्तेवर आल्यानंतर विश्वासदर्शक ठराव मंजूर करून घेतला असल्यामुळे आणखी चार महिने ते काढू शकतील. सैनी सरकारला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी दुष्यंत चौटाला यांनी काँग्रेसला सहकार्य करण्याची भूमिका घेतली असली तरी ते शक्य नसल्याचे दिसते.

सप्टेंबरमध्ये सरकारवर अविश्वास ठराव आणला जाऊ शकतो, परंतु लगेचच ऑक्टोबरमध्ये निवडणुका आहेत. त्याअर्थाने या घडामोडींमध्ये सनसनाटी काही नसले तरी लोकसभा निवडणुकीच्या काळात अपक्षांनी भाजपची साथ सोडण्याचे अनेक राजकीय अर्थ निघू शकतात. नवी समीकरणेही आकाराला येऊ शकतात.

# आयु.बाळासाहेब उर्फ प्रकाश यशवंतराव आंबेडकर यांच्या १० मे ७० व्या वाढदिवसा निमित्याने विशेष लेख.

आंबेडकरी विचारांचे चळवळीचे राजकीय वारसदार.

आदरणीय बाळासाहेब उर्फ प्रकाश यशवंतराव आंबेडकर आज आपण आंबेडकरी विचारांचे चळवळीचे आणि रक्ताचे वारसदार आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आपण खऱ्या अर्थाने राजकीय चळवळीचे वारसदार सुद्धा आहेत हे सिद्ध करून दाखविले. सम्यक समाज आंदोलन या सामाजिक जनआंदोलनातून आपण सुरवात केली होती.त्या जनआंदोलनाचे आपण नेते होता. त्यात मोठे योगदान देणारे नेते अर्जुन डांगळे आणि अविनाश महातेकर हे होते.(ते आज कुठे आहेत हे शोधावे लागते.) याच्या मुळेच मुंबईसह राज्यात गांव तिथे बौध्द महासभेची शाखा,गांवागांवात जाऊन जनजागृती करण्याचा यशस्वी प्रयत्न झाला होता. त्यातून अनेक निष्ठावंत कार्यकर्ते तयार झाले.खूप मोठी जनजागृती झाली होती. असे लिहले तर चुकीचे होणार नाही.त्यामुळेच राजकीय समीकरण बदलली होती. तो बदल समाजवादी,डाव्यांनी उचलून धरल्यामुळे सतत प्रसिद्धी मिळत होती. तेच हवा निर्माण करीत होते.हे सर्वच मान्य करतात.तो बदल काही अर्थाने २०२४ ला पूर्ण झाला असे म्हणता येईल.आणि अपूर्ण राहिला असे ही म्हणता येत नाही.त्याचे सत्यशोधक पद्धतीने आत्मपरीक्षण करून त्यातील काही प्रश्न आपल्या ७० व्या वाढदिवसा निमित्य आपल्या भक्त आणि शिष्या समोर मांडण्याचा हा प्रयत्न करतो. कारण आंबेडकरी चळवळीत अनेक बुद्धिवादी लेखक,पत्रकार,साहित्यिक आहेत.पण त्याच्या मध्ये एका गोष्टीचा अभाव आहे.तो म्हणजे निर्णय घेण्याची क्षमता त्याच्यात नाही.सत्य मांडल्यावर समाज काय म्हणेल?. सत्ताधारी नाराज होतील.याची त्यांना भिती वाटते. म्हणून ते सत्याला सत्य म्हण्यास लिहण्यास घाबरतात.हे आपणच (विचारवंतां कडून अपेक्षा –आंबेडकर चळवळ संपली आहे.पण नंबर ३६ ) म्हटले आहे.त्यामुळे हा नियम मला लागू नाही.कारण मी प्राध्यापक,वकील ,इंजिनियर,साहित्यिक,विचारवंत नाही. एक असंघटीत कामगार व कार्यकर्ता आहे.आणि अब्राम्हणी सत्यशोधक मासिकातून लिहता लिहता वृत्तपत्रात लिहायला लागलो.क्रांतिकारी विचारांच्या चळवळीची दिशा व दशा यावर सत्य शोधक नजरेतुन चिंतन आणि परीक्षण करून लिहायला ल ा ग ल ा ` .




प्रकाश यशवंत आंबेडकर यांचा जन्म १० मे १९५४ रोजी मुंबईत झाला.बाळासाहेब आंबेडकर नावाने लोकप्रिय आहेत.भारतीय राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते वकील आहेत त्यांनी भरिप बहुजन महासंघ या राजकीय पक्षाची स्थापना केली होती. तेच संस्थापक व अध्यक्ष होते. प्रकाश आंबेडकर हे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आहेत. बाळासाहेब आंबेडकर हे दोनदा लोकसभा व एकदा राज्यसभा असे एकूण तीन वेळा संसदचे सदस्य (खासदार) राहिलेले आहेत. २०१८ मध्ये त्यांनी सुमारे १०० लहान–मोठ्या राजकीय पक्षांना एकत्र घेत वंचित बहुजन आघाडी या राजकीय पक्षाची स्थापना केली होती २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाने लक्षवेधी मतदान घेऊन बहुजन समाजात एक नव्या राजकीय पर्याय दिला होता.आताच्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी लक्षवेधी ठरत आहे.

भूमिहीन शेत मजुरांचे प्रश्न सोडविण्या करिता त्यांना आपण गायरान,पडीत, वनविभागाच्या जमीन ताब्यात घेऊन कसायला लावून शेतमजुरांचे अल्पभूधारक शेतकरी केले. त्याच्या त्या कसलेल्या जमिनी नांवावर करण्यासाठी भूमिहीन हक्क संरक्षण समिती स्थापन केली होती. त्यामुळे बाबासाहेबाच्या लढ्यातील एका सेनापतीच्या अर्धवट राहिलेल्या लढ्याला आपण एक वेगळी दिशा देण्याचे काम हाती घेतले होते. कसेल त्याची जमीन नसेल त्याचे काय?. या घोषणेने राज्यच नव्हे तर संपूर्ण देश ढवळून निघाला होता.तोच धागा पकडून आपण राजकारण नको समाजकारण हवे त्याच्या समाज परिवर्तनातून राजकारण करू असाही आपला संकल्प होता.त्यामुळे राज्यातील नव्हे तर देशातील मागासवर्गीय,शोषित,पिडीत,आदिवाशी समाज तुम्हाला अंधार नष्ट करणारा नवा सूर्य प्रकाश म्हणत होती.सूर्याची किरण वरून खाली येतात.इथे प्रकाश खालून वर गेला.त्या आंदोलनातील लोक काल पण आपल्या सोबत होते आणि आज ही तुमच्या सोबत असतील ते केवळ बाबासाहेबांचे नातु म्हणून.२०१४,२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत आपण मोठ्या धाडसाने वंचित बहुजन आघाडीचा राजकीय प्रयोग करून पाहिला त्यामुळेच आता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी हा सर्वच राजकीय पक्षांना धडक देणारा पक्ष वाटत आहे. त्यांच्या मतावर अनेकांचा डोळा होता तो आता सोडून देण्यास भाग पडत आहे. तो वाचविण्यासाठी स्वताला आंबेडकरी विचारांचे समजणारे दोनशे मान्यवर त्यांच्या संस्था संघटना केवळ वंचितचे अस्तित्व निर्माण होऊ नये यासाठी महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन जीवतोडून करीत आहेत.तुमची एवढी मोठी संघ शक्ति २०१४,२०१९ ला लोकसभा निवडणुकीत दाखविली असतांना महाविकास आघाडीने तुम्हाला मान सन्मान दिला नाही.याचे दुख या मान्यवरांना नाही. तरी ते महाविकास आघाडीतील लबाड बेइमान नेत्यावर विश्वास ठेवून समाजाच्या लोकांना मतदान करण्याचे आवाहन करतात. याला काय म्हणावे?.

आदरणीय ऍड बाळासाहेब आंबेडकर भारिप बहुजन महासंघाचे राष्टीय अध्यक्ष झाल्यावर माझा पक्ष,माझी सत्ता घोषणा दिली. आणि मी आंबेडकरी चळवळीतील राजकीय निळ्या आकाशातील चमकणारे तारे आहोत.हे दाखवून दिले.ज्या डॉ. बाबासाहेबाच्या रक्ताचे आपण वारसदार आहेत.त्या बाबासाहेबानी आपले आयुष्य अस्पुष्य समाजाला धार्मिक,सामाजिक,शैक्षणिक आणि राजकीय अधिकार मिळवून देण्यासाठी खर्ची केले.त्यासाठी त्यांनी अनेक राजकीय सामाजिक शैक्षणिक संस्था,संघटना,पक्ष निर्माण केल्या. त्याची सुरवात त्यांनी बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन करून केली.पुढे त्याचा विस्तार करत समाज समता संघ उभा केला.राजकीय क्षेत्रात आपले हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी ’स्वतंत्र मजूर पक्ष ’ स्थापन केला. भारतदेश हा कृषी प्रधान आहे ७० टक्के लोक शेतीवर मजुरी करून जगतात.त्यातील ८५ टक्के समाज हा बहुजन समाजातील आहे.म्हणजे अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त भटक्या जाती,इतर मागासवर्गीय,आदिवाशी समाजातील लोक आहेत.पण ते कधीच कोण्या पक्षाच्या नेत्या बरोबर प्रामाणिक पणे जोडून राहिले नाहीत. कारण नेताच विचारधारेशी प्रामाणिक राहून आचरण करणारा नव्हता असे लिहले तर चुकीचे ठरणार नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर याचे स्वप्न होते की माझा समाज सत्ताधारी जमात व्हावा. महाराष्टातील आजची राजकीय वर्तमान स्थिती पाहता रिपब्लिकन पक्षातील फुट एकजातीय आहे.केवळ सर्व बौद्ध समाज एकत्र आला तर राजकीय टक्केवारी पाहता सत्ताधारी बनू शकत नाही.पण सर्व बौद्ध समाजातील आंबेडकरी गट एकत्र आले तर एकच गट मजबूत होऊ शकतो.त्याची एकी पाहून इतर मागासवर्गीय आदिवाशी भटक्या समाजातील लोक या पक्षाकडे आकर्षित होऊ शकतात.त्यासाठी एक विश्वास पात्र नेत्याची गरज आहे. आणि ते फक्त बाळासाहेब आंबेडकर असु शकतात.त्यासाठी त्यांना दूरदर्शी व धोरणी,मुत्सद्दी पण दाखवला म्हणूनच अनेक राजकीय प्रयोग करूनच आज वंचित बहुजन आघाडी राज्यात लक्षवेधी ठरली आहे.

२१ जानेवारी १९४९ रोजी औरंगाबादला झालेल्या कार्यकमात बाबासाहेब आपल्या अनुयायांना उदेशून सांगतात.जो पर्यंत तुम्ही तुमची मजबूत संघटना जगाला इतर समाजाला दाखवत नाही तो पर्यंत तुमच्यावर असे अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होतच राहतील.म्हणून दुसऱ्यावर अवलबून राहू नका.स्वताची ताकद निर्माण करा.मग पहा तुम्हाला कोण त्रास देतो. तुमच्यावर हल्ला करण्यासाठी त्यांना शंभर वेळ विचार करावा लागेल.बाळासाहेब आज जो तो नेता संस्थापक राष्टीय अध्यक्ष आहेत.त्यांना त्याची मर्यादा आपण दाखवू शकता.प्रत्येक नेत्याला त्याचा मतदार संघ वाटून द्या इतर जिल्ह्यात मतदार संघात ढवळाढवळ करण्याचीही कोणालाही गरज नाही.आपण लिहता की आंबेडकरी चळवळीचा व आंबेडकरी विचाराचा माणूस मोठ्या प्रमाणत मुंबई,नांदेड, विदर्भातील बुलढाणा,अकोला,भंडारा,गोंदिया,चद्रपूर,नागपुर,गडचिरोली, असे काही आंबेडकरी जिल्हे आहेत. तिथे आंबेडकरी विचारधारेची माणस घडविण्याची गरज आहे.( आंबेडकरी चळवळ संपली आहे,पान ४१/४२ )

ऍड.बाळासाहेब आंबेडकर उर्फ प्रकाश आंबेडकर यांच्यावर लिहणे म्हणजे खूप मोठी जोखीम असते.त्याच्या भक्तांना त्याच्या बाबत खरे लिहणे पसंत पडत नाही. प्रकाश यशवंत आंबेडकर हे आंबेडकरी चळवळीतील एक तरुण तडपदार नेतृत्व म्हणून प्रसिद्ध आहेत, पण त्याच बरोबर ते अत्यंत अभ्यासू, दूरदर्शी व धोरणी,मुत्सद्दी नि परिवर्तनवादी म्हणून ही त्यांची ख्याती आहे असे म्हणतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ते नातू असल्यामुळे सर्व समाज त्यांचा खूप आदर करतात. पण त्या पलिकडे जाऊन एक स्वतंत्र व्यक्तीमत्व म्हणून त्यानी स्वत:ची ओळख निर्माण करत राजकारणात व समाजकारणात मोठी मजल मारली. खरं तर बाबासाहेबांच्या घरात जन्माला आल्यावर नावाचा जो फायदा मिळतो तो मिळालाच पण त्याच बरोबर मोठ्या माणसाच्या घरात जन्मास येण्याचे तोटे ही असतात.प्रकाश आंबेडकर हे बाबासाहेबांचे नातू असल्यामुळे उगीच लोकांच्या अपेक्षाही उंचावल्या अन त्यात काही वावगं ही नाही.मात्र त्यातून सावरत त्यानी स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करत अकोल्यात वेगळा राजकीय आदर्श घालून दिला.एकमेव नेता असा आहे कि ज्याचा स्वताचा मतदार संघ आहे.बाकी सर्व आंबेडकरी चळवळीतील राजकीय नेते उंटावरचे शहाणे आहेत.जे स्वताला संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घेतात पण वीस वर्षात स्वताचा मतदार संघ बांधू शकले नाहीत.म्हणूनच बाळासाहेब आंबेडकर हे आंबेडकरी चळवळीचे राजकीय वारसदार बनावे.करीता मित्रांना शत्रू न बनविता मित्रच राहु द्या मित्र शत्रु झाल्यास काय होते हे एका गोष्टीतुन पाहता येईल. एकदा कुत्र्यात व गाढवात पैज लागते की जो लवकरात लवकर मुंबईत जाईल तो सिंहासनावर बसेल. ठरल्याप्रमाणे दोघेही तयार झाले.कुत्र्याला वाटले मीच जिंकेल कारण गाढवापेक्षा मी जास्त धावू शकतो.पण कुत्र्याला पुढे काय होणार यांची नक्की माहिती नव्हती.शर्यत सुरू झाली कुत्रा जोरात धाऊ लागला.पण थोडेसे पुढे गेला नसेल तर लगेच गल्लीतील कुत्र्यांनी त्याला हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. असेच प्रत्येक गल्लीत प्रत्येक चौकात घडत राहिले कसा बसा कुत्रा धावत धावत सिंहासना जवळ पोहचला तर बघतो तर काय गाढव त्या आधीच पोहचले होते.त्यामुळे त्याने शर्यत जिंकून ते राजा झाले होते.निराश झालेला कुत्रा तेव्हा म्हणतो माझ्याच लोकांनी मला मागे ओढलं नसते तर आज गाढव सिंहासनावर बसले नसते.लोकसभा २०२४ च्या निवडणुकीत २०० संस्था,संघटना त्यांचे स्वयं घोषित नेते कार्यकर्ते वंचित ला मतदान करू नका हा प्रचार करीत आहेत. हे करून त्यांना काय मिळणार आहे?.महाविकास आघाडीतील नेते यांना आजूबाजूला बसऊन समाजात चांगला गैरसमज निर्माण केला म्हणून चमचा भूषण,दलाल रत्न पुरस्कार देऊन गौरव करणार आहेत काय?. लोकसभा निवडणुकीचा निकाल काही येवो वंचित बहुजन आघाडी ने मैदान गाजवले असे लिहावे लागेल. आंबेडकरी विचारांचा राजकीय पर्याय निर्माण होऊ शकतो हे माननीय प्रकाश आंबेडकर यांनी वयाच्या सत्तरव्या वर्षी दाखवून दिले हेकाय कमी आहे. ते येणाऱ्या तरुण पिढीला शंभर टक्के प्रेरणादायी ठरेल हे मात्र नक्की आहे. म्हणूनच आपण स्वाभिमानी आहात आदरणीय बाळासाहेब उर्फ प्रकाश यशवंतराव आंबेडकर आज आपण आंबेडकरी विचारांचे चळवळीचे आणि रक्ताचे वारसदार आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आपण खऱ्या अर्थाने राजकीय चळवळीचे वारसदार सुद्धा आहात हे सिद्ध करून दाखविले.आपल्या ७० व्या वाढदिवसा निमिती हार्दिक शुभेच्छा



*****

सागर रामभाऊ तायडे–
भांडूप मुंबई
–९२२१३१५८०६,
अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना
संलग्न स्वतंत्र मजदूर युनियन.

# औषधनिर्मितीतील भरारी

साधारणत: अडीच दशकांपूर्वीपर्यंत औषधनिर्मितीच्या क्षेत्रात भारत स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर होता. औषधांसाठी लागणारा कच्चा माल म्हणजेच एपीआयही भारतातच तयार होत असे; पण चीनने या क्षेत्रात घुसखोरी केली आणि स्वस्त दरात एपीआय पाठवून भारतातील हे क्षेत्र विस्कळित केले. परंतु कोविडोत्तर काळात भारताने या क्षेत्रात पुन्हा आत्मनिर्भर होण्यासाठी सुनियोजित पावले टाकली. भारत एवढ्या संख्येने आपल्या औषधी उद्योगाची पुनर्बांधणी करेल, याची कल्पना कदाचित चीनला नव्हती. म्हणूनच त्याने जगभरातील औषध उद्योगांवर ताबा मिळवण्यासाठी जादा क्षमता विकसित केली होती. पण आता चीनमध्ये एपीआयचा साठा आणि पुरवठा खूप झाल्याने किमतीत घट होणे स्वाभाविकच आहे.

दीर्घकाळ चीनवर अवलंबून असलेले भारताचे औषधी क्षेत्र आता त्याच्या जाळ्यातून हळूहळू मुक्त होताना दिसत आहे. यामागचे कारण म्हणजे ‘आत्मनिर्भर भारत अभियान.’ सन २००० पर्यंत भारत औषध क्षेत्रात जवळपास आत्मनिर्भरच होता. औषध उत्पादन क्षेत्रात आवश्यक असणारी सामग्री म्हणजेच कच्चा माल त्यास आपण ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल्स इनग्रेडियंटस् (एपीआय) असे म्हणतो, तो २००० पर्यंत भारतातच तयार व्हायचा आणि तत्कालीन काळात उत्पादकांसाठी निकोप स्पर्धा देखील होती. कच्च्या मालाच्या मुबलकतेमुळे देशातील औषध उद्योग हा केवळ वेगाने विकसित होत नव्हता, तर जगाला वाजवी किमतीत आवश्यक औषध देखील उपलब्ध करून देत होता. पण चीनच्या कुरापतीमुळे भारताचे एपीआय क्षेत्र विस्कळीत झाले. कारण चीनमधूनच पडत्या भावात कच्चा माल भारतात पाठवला जाऊ लागला. परिणामी भारताचा एपीआय उद्योग हा स्पर्धात्मक राहिला नाही आणि कंपन्या हळूहळू बंद पडू लागल्या. उदाहरणार्थ एमोक्सिसायक्लिन नावाची ॲंटिबायोटिक ही पेनिसिलिन–जी तत्त्वातून तयार केली जाते. पेनिसिलिन–जी नावाचा एपीआय भारतात पुरेशा प्रमाणात तयार होतो आणि त्याचे आंतरराष्ट्रीय बाजारातील मूल्य सुमारे २२ डॉलर प्रतिग्रॅम होते. मात्र चीनने त्याचे भाव पाडण्यासाठी डंपिंग धोरण केले आणि पेनिसिलिन–जी हे नऊ डॉलरपेक्षा कमी मूल्यांवर विकण्यास सुरुवात केली. कालांतराने चीन हा प्रारंभी ‘एपीआय’ दुप्पट आणि नंतर चौपट किमतीने विकू लागला. पर्याय नसल्याने भारतीय कंपन्यांना चीनने निश्चित केलेल्या किमतीवर कच्चा माल खरेदी करणे भाग पडले. अशीच स्थिती अन्य ‘एपीआय’च्या बाबतीत राहिली.कच्च्या मालाच्या किमतीतील सर्वाधिक वाढ ही कोरोनाकाळात पाहावयास मिळाली. त्यामुळे देशातील एपीआय उद्योगाची पुनर्बांधणी ही केवळ औषधी क्षेत्रात आत्मनिर्भर होणे किंवा औषधाच्या किमती कमी करण्यापुरती नाही तर आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने देखील महत्त्वाची असल्याचे केंद्र सरकारला कळून चुकले. चीन हा भारतासमवेत वैरभावना बाळगतो. त्यामुळे औषधासाठी अत्यावश्यक असलेल्या सामग्रीसाठी यापुढे चीनवर अवलंबून राहता येणार नाही, असेच धोरण आखणे गरजेचे होते. त्यानुसार सरकारने पावले टाकली. मे २०२० मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनच्या आणि अन्य देशांच्या डंपिंग धोरणांमुळे मोडकळीस आलेल्या उद्योगांची पुनर्बांधणी करण्याचा आणि परदेशावरचे अवलंबित्व संपविण्याच्या दृष्टीने ‘आत्मनिर्भर भारत अभियान’ सुरू केले. प्राथमिक पातळीवर एपीआयमध्ये सामील असलेल्या तेरा वस्तू निश्चित करण्यात आल्या. शिवाय एपीआय क्षेत्रासाठी उत्पादनाशी संबंधित प्रोत्साहन (पीएलआय) योजनेत ४१ उत्पादनांचा समावेश करण्यात आला. त्यात मधुमेह, स्टेरॉईड, ॲंटिबायोटिक आदींसाठीच्या औषधावर अधिक भर देण्यात आला. यासाठी २० हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली. विशेष म्हणजे ही योजना आपले ध्येय गाठण्यासाठी काम करत असून देशातील औषध उद्योग आत्मनिर्भर होण्याकडे वेगाने वाटचाल करताना दिसत आहे. उदा. पेनिसिलीन–जी चे भारतातील उत्पादन बंद झाले होते आणि आता आता त्याचे उत्पादन अनेक कंपन्यांनी सुरू केले आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविय यांच्या मते, पीएलआय योजना आणि अन्य प्रयत्नांच्या बळावर आज भारत बहुतांश एपीआय क्षेत्रात आत्मनिर्भर झाला आहे. परिणामी चीनवरचे अवलंबित्व कमी झाले आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये पीएलआय योजनेंतर्गत कंपन्यांना ४ हजार कोटी रुपये आणि वैद्यकीय उपकरणासाठी २ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची परवानगी देण्यात आली.

# लोकशाही संसद म्हणजे अनुभव मंटप!

भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय व सामाजिक जीवनातील ज्येष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष म्हणून संत बसवेश्वर यांच्याकडे पाहिले जाते. महाराष्ट्रातील सोलापूर येथील मंगळवेढा येथे त्यांनी तब्बल ३१ वर्षे वास्तव्य केले होते. बसवेश्वरांनी मंगळवेढ्यातूनच लिंगायत धर्माची स्थापना केली, असे सांगितले जाते. सदर लेखात बापू- श्रीकृष्णदास निरंकारी ज्ञानवर्धक संकलित माहिती मांडत आहेत... संपादक.

महात्मा बसवेश्वर महाराज यांना बसव, बसवण्णा असेही म्हणतात. हे कर्नाटकातील संत, समाजसुधारक होते. त्यांनी हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेविरुद्ध व अन्य हानिकारक प्रथांविरुद्ध संघर्ष केला. त्यांनी निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला. शालिवाहन शके दहाव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावात ११०५ साली प्रतिष्ठित वीरशैव कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म झाला. काहींच्या मते तो इंगळेश्र्वर जि. विजापूर या गावी झाला असावा. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद असले, तरी सामान्यतः त्यांचा जन्म आजच्या तिथीला- वैशाखातील अक्षय्य तृतीयेला झाल्याचे मानले जाते. त्यांचे वडील मणिराज ऊर्फ भादरस हे बागेवाडी आगाराचे भांडारप्रमुख होते. त्यांच्या पत्नी मादुलांबा- मादंबा परम शिवभक्त होत्या. बसवेश्वरांच्या भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव नागम्मा होते. बसवेश्वर कर्मठ विधींना विरोध करत. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी मुंजीची तयारी झाल्यावर मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे, असे म्हणून मुंज करून घ्यायचे नाकारले आणि घर सोडून ते कूडलसंगम जि. विजापूर येथे निघून गेले. कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते. तेथे बसवेश्वरांनी बारा वर्षे वास्तव्य केले. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे राहिले. भारतीय लोकशाही संसदेची स्थापना बसवण्णांनी मंगळवेढा येथे लोकशाही संसद म्हणजेच अनुभव मंटपाची स्थापना केली. या अनुभव मंटपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करावी, यावर चर्चा करण्याचे कार्य चालत असे. बसवण्णांनी समाजातील रूढीपरंपरा, वाईट चालीरीती यांना विरोध करून समाजाच्या हितकारक गोष्टींची अंमलबजावणी करणारी नवीन यंत्रणा तयार केली. बाराव्या शतकातील आदर्श प्रशासक, समतेचे प्रणेते म्हणून महात्मा बसवेश्वरांना ओळखले जाते. सर्व प्रथम लोकशाही मूल्याची सुरूवात ही म.बसवेश्वरांनी १२व्या शतकात अनूभव मंटपाच्या माध्यमातून केल्याचे वचनसाहित्यातून दिसून येते. एकूणच त्यांनी वचनसाहित्यात समता, मूल्य, न्याय, बंधूता, एकात्मता तसेच स्वातंत्र्य, अधिकार, नियंत्रण व शिस्त, सूशासन आणि प्रशासन आदी बाबींवर सखोल विवेचन केले आहे. सद्यस्थितीत शासन व प्रशासन या विचारांचा अवलंब केल्यास निश्चितच देशात निर्माण होणारी विषमता, हिंसा, भेदभाव व जातीय राजकारण इ.समस्यावर पायबंद- आळा घालता येईल. परिणामतः चांगले सुशासन व प्रशासन व्यवस्था निर्माण होइल.

समाजाचे ऐक्य म्हणजे येथील अध्यात्मिक शक्तींचे ऐक्य होय, हे तत्त्व बसवण्णा जाणून होते. भारतातील अध्यात्माचे ऐक्य साधण्यासाठीच त्यांनी अनुभव मंटप ही संस्था स्थापन केली. या संस्थेत प्रवेश घेण्यास कोणासही बंदी नव्हती. स्त्रियांनासुद्धा संस्थेचे सभासद होता येत होते. जातीभेदाला तर थाराही नव्हता. प्रत्येक माणसाला धार्मिक जीवन जगण्याची समान संधी मिळावी. त्या धार्मिक जीवनात जन्म, जात, व्यवसाय, स्त्री-पुरुष म्हणून भेदभाव केला जाऊ नये. भारतात प्राचीन काळापासून भगवान शिवाची उपासना होत आली आहे. नंदी हा भगवान शिवाचे वाहन आणि शिष्य. कृषिप्रधान भारतात वृषभ- बैल हा शेतकऱ्यांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू ठरणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. वृषभाला नंदीच्या रूपात पूजण्याची प्रथाही भारतात प्राचीन काळापासून आहे. सोमवार हा भगवान शंकराचा वार मानला गेला आहे. यादिवशी बैलांना शेतीकामाला जुंपण्यात येत नाही. शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता भाव ठेवून आठवड्यातून एकदा विश्रांती देण्याची परंपरा भारतीयांच्या तरल संवेदनेची ओळख करून देण्यास पुरेशी आहे.

पशु-पक्षांचे शोषण होऊ नये यासाठी २१व्या शतकातील मानव कायदे बनविताना दिसतो, परंतु भारतामध्ये प्राणिमात्रांवर दया करणेच नव्हे, तर ईश्वररूपात पाहणेदेखील दैनंदिन आचरणाचा अविभाज्य भाग आहे. ९०० वर्षांपूर्वी समाजात समरसता निर्माण करणाऱ्या महात्मा बसवेश्वरांना साक्षात नंदीचा अवतार मानले गेले. संस्कृतमधील वृषभ या शब्दाचे बसव हे कन्नड रूप. सन ११३१मध्ये बसवण्णांचा जन्म झाला. बसवला लोक प्रेमाने बसवण्णा म्हणत. पुढे लोकांनी त्यांना आदराने बसवेश्वर हे नामाभिधान दिले. समुद्राला भरती येते, त्यानंतर ओहोटी येते. सूर्य मध्यावर येतो आणि नंतर मावळतोही. समाजाचेही तसेच असते. या भूमीने व्यास, कपिल, कनाद, गौतम, चार्वाक, महावीर आणि बुद्ध यांच्यासारखे श्रेष्ठ तत्त्ववेते, चंद्रगुप्तांसारखे सम्राट निर्माण केले. समाज भरभराटीला आला आणि नंतरच्या काळात अधोगतीही झाली. निरर्थक अंगरूढींनी उच्छाद मांडला. स्पृश्य-अस्पृश्यता यांसारख्या समाजाला मागे खेचणाऱ्या प्रथा बोकाळल्या. दुर्दैव असे की हे सारे धर्माची झूल पांघरून सुरू होते. अशावेळी बसवण्णा यांचा उदय झाला. आधुनिक सुधारणावाद्यांपेक्षा बसवण्णा वेगळे होते. १९व्या शतकातील थोर सुधारक स्वामी विवेकानंदांच्या शब्दांत सांगायचे तर आधुनिक सुधारणावाद्यांना धर्माची मोडतोड केल्यावाचून सामाजिक सुधारणा करणे अशक्य वाटते. अलीकडच्या काळात असा प्रयत्न ज्यांनी ज्यांनी केला, त्यांना अपयश मिळल्याचे दिसते. कारण त्यांच्यापैकी फारच थोड्यांनी स्वत:च अभ्यास केला होता आणि सर्व धर्मांची जननी असलेल्या आपल्या धर्माचे शिक्षण, त्यासाठी आवश्यक ती साधना तर एकाचीही झाली नव्हती. समाजाची अवनती होते, ती धर्मामुळे नव्हे तर धर्मतत्त्वांचे योग्यरीतीने पालन न केल्याने, हे महात्मा बसवेश्वर जाणून होते. कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगम ठिकाणी असलेल्या गुरुकुलात ज्ञानी गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले होते. विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला होता. त्यामुळे त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्त्वे कन्नडमधून लिहिली. बसवण्णांपूर्वी कन्नड वाङ्मय फक्त पद्यस्वरूपात लिहिले गेले होते. बसवण्णांनी गद्यातून वचने लिहिण्यास सुरुवात केली, त्यामुळे कन्नड भाषेतील गद्य वाङ्मयाचा विकास झाला. कित्येक शिवशरणांनी म्हणजे शैवसंतांनी बसवण्णांचे अनुकरण केले. या वचनांचा लोकांमध्ये प्रचार झाला. वचनांच्या माध्यमातून समाजाच्या निरनिराळ्या बाबींवर प्रकाश टाकण्यात आला. समाजाची नैतिक व धार्मिकदृष्ट्या रचना कशी असावी, हे सांगण्यात आले. प्रत्येकाने आपल्या पोटापाण्याचा व्यवसाय करतानाच प्रामाणिक व आध्यात्मिक जीवन जगायला मार्गदर्शक ठरतील अशी तत्त्वे बसवेश्वरांनी समाजाला दिली. कर्नाटक आणि दक्षिण महाराष्ट्रातील खेड्यांतील लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झालेली दिसतात. बसवण्णांचे समाजपोषक विचार आणि आचार याने प्रभावित होऊन चालुक्य राजाच्या दरबारात बसवण्णांना मानाचे स्थान मिळाले. सर्वसामान्यांच्या उन्नतीची कामे करण्यात बसवण्णांचा हातखंडा होता. निस्पृहता आणि कर्तृत्वाच्या बळावर बसवण्णा राज्याच्या मंत्रिपदी आरूढ झाले. सत्ता आणि वैभव, कीर्ती पायाशी लोळण घेतानाही बसवण्णा आध्यात्मिक नीति मूल्यांपासून ढळले नाहीत. या समाजाचे ऐक्य म्हणजे येथील अध्यात्मिक शक्तींचे ऐक्य होय, हे तत्त्व बसवण्णा जाणून होते. भारतातील अध्यात्माचे ऐक्य साधण्यासाठीच त्यांनी अनुभव मंटप ही संस्था स्थापन केली. या संस्थेत प्रवेश घेण्यास कोणासही बंदी नव्हती. स्त्रियांनासुद्धा संस्थेचे सभासद होता येत होते. जातीभेदाला तर थाराही नव्हता.

मनापासून केलेले प्रत्येक काम हीच खरी शिव उपासना हे त्यांच्या कायक व कैलास सिद्धांताचे सार होय. शारीरिक श्रम वा व्यवसाय हाच स्वर्ग- कैलास आहे. कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाहीत, असे सांगून त्यांनी श्रमप्रतिष्ठा वाढविली. कायक हे केवळ पैशासाठी सांगितलेले नाही. तसेच ते कर्मसिद्धांतावर आधारलेले नसून त्यात व्यक्तीला व्यवसायस्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. श्रमप्रतिष्ठेबरोबरच गरजेनुसार संपत्तीची विभागणी करावी, ही विचारसरणी (दासोह) मांडल्यामुळे बसवेश्र्वरांची वृत्ती समाजवादी, समतावादी होती, असे दिसून येते. दासोह सिद्धांतात आपण कमावलेले धन केवळ स्वतः पूरते न वापरता त्याचा समाजासाठी उपयोग करण्याची संकल्पना त्यांनी मांडली.

बसवेश्र्वरांच्या उपदेशामुळे वेगवेगळ्या व्यवसायांना, विशेषतः ग्रामोद्योगांना, प्रोत्साहन मिळाले आणि सर्व व्यावसायिकांमध्ये समभाव निर्माण झाला. बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीला शुद्र, बहिष्कृत समजले जात असे. स्त्रीयांवर अन्याय होत होता, म्हणून त्यांनी स्त्रियांसाठी मोठे भरीव कार्य केले. स्त्रियांना मत स्वातंत्र्याचा अधिकार दिला. त्यांना धार्मिक आणि आध्यात्मिक हक्क दिले. स्त्रियांची अशुद्धतेच्या कल्पनेतून आणि पंचसुतका पासून सुटका केली. तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने १२व्या शतकात घडला. मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवंत व मधुररस ब्राह्मण मंत्र्याची मुलगी कलावती यांच्यात विवाह घडवून आणला. असा आंतरजातीय विवाह तोही १२व्या शतकात हे खूपच क्रांतिकारक आणि धाडसी होतं कारण आजही म्हणजे ९०० वर्षांनंतरही आपल्या समाजाची असा विवाह स्वीकारण्याची पूर्ण तयारी झालेली दिसत नाही. बसवेश्र्वरांनी कल्याण येथे निर्माण केलेली शिवानुभवमंटप म्हणजेच अनुभवमंटप ही संस्था जागतिक धर्मेतिहासातील अनन्यसाधारण संस्था होय. हे त्या काळातील पहिले लोकशाहीचे संसद होते. वेगवेगळ्या जातींतील व व्यवसायांतील भक्त म्हणजेच शिवशरण येथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा करीत असत. ही चर्चा लयबद्ध गद्यातून होत असे. तत्कालीन शिवशरण-शरणींची अशी वचने पुढे संग्रहीत करण्यात आली. मंटपातील चर्चेच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये जागृती केली. येथे परिसंवादाच्या स्वरूपाची जी चर्चा होत असे, तीच कन्नड साहित्यामध्ये वचनसाहित्याच्या रूपाने प्रसिद्ध झाली. वचन साहित्यातून त्यांनी समाजात प्रबोधनरूपी विचार पेरले.

!! जयंतीनिमित्त भगवान बसवेश्वरांना अनंतकोटी दंडवत प्रणाम !!

************

-संकलन व सुलेखन -
संतचरणरज: बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.
पोटेगावरोड, गडचिरोली.
फक्त दूरभाष- ७१३२७९६६८३.

# 'या' १०० ग्रॅम फळभाजीच्या सेवनाने झपाट्याने वजन होईल कमी; हृदय राहील निरोगी, ठणठणीत!



रोजच्या आहारात आपण अनेक भाज्यांचा समावेश करत असतो. यात फळभाज्यांपासून ते पालेभाज्यांपर्यंत अनेक भाज्यांचा समावेश असतो. सर्वांनाच माहीत आहे की, हिरव्या भाज्या आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तोंडली एक लोकप्रिय भाजीचा प्रकार आहे. तसं तर कच्ची तोंडलीदेखील खाल्ली जातात. या तोंडल्याचे आपल्या शरीरासाठी अनेक फायदे आहेत. परवलसारखी दिसणारी ही फळभाजी किंचित लहान आणि मऊ असते. यामध्ये अनेक पोषक घटक असतात, जे आपल्याला मोठ्या आजारांशी लढण्यास मदत करतात. १०० ग्रॅम तोंडलीच्या सेवनाने तुमच्या शरीरात कोणते बदल घडून येऊ शकतात, याच विषयावर हैदराबाद येथील केअर हॉस्पिटल्सच्या आहारतज्ज्ञ जी. सुषमा यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. सविस्तर माहिती आपण जाणून घेऊ

आहारतज्ज्ञ जी. सुषमा म्हणतात, आपण तोंडलीची भाजी दररोज खात नाही, परंतु तोंडलीची भाजी आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. तोंडलीच्या भाजीच्या चवीपेक्षाही त्यात जीवनसत्त्वाचे खनिज खूप मोठ्या प्रमाणात आहे. १०० ग्रॅम तोंडलीमध्ये सुमारे १.४ मिलीग्राम लोह, ०/०८ मिलीग्राम व्हिटॅमिन बी -२ , ०.०७ मिलीग्राम व्हिटॅमिन-बी १, १.६ ग्रॅम फायबर आणि ४० मिलीग्राम कॅल्शियम असते. तोंडलीमध्ये व्हिटॅमिन ए, बी १, बी २, सी, पोटॅशिअम, मॅग्नेशिअम यांसारखे अनेक पोषक घटक आहेत. तोंडलीचा आकार जेवढा छोटा आहे, तेवढीच तोंडलीची भाजी चवीला खूप चविष्ट असते. तोंडली अनेक आजारांवर फायदेशीर आहे, त्यामुळे आठवड्यातून काही वेळा ते तुमच्या जेवणात समाविष्ट करण्याचे ध्येय ठेवा.तोंडली खाण्याचे फायदे

१. पचनप्रक्रिया सुधारते

तोंडलीमध्ये फायबर जास्त प्रमाणात असल्यामुळे ते आपली पचनप्रक्रिया सुधारते, त्यामुळे तोंडली अपल्यासाठी फायदेशीर आहे. रोज तोंडली खाल्ल्याने सिडिटीची समस्या होत नाही, यामुळे आपल्या आहारात तोंडलीचा समावेश करणे खूप गरजेचे आहे.

२. वजन कमी करण्यासाठी फायदेशीर

वजन कमी करण्यासाठी तोंडली फायदेशीर आहे. यामध्ये फायबरचे प्रमाण अधिक असते. हे प्रमाण वजन कमी करण्यास उपयुक्त ठरू शकते. तोंडली खाल्ल्याने भूकेवर नियंत्रण येण्यास मदत होते.

३. हृदय राहते निरोगी

तोंडलीमध्ये अनेक पौष्टिक गुणधर्म असतात जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. तोंडली हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी समस्या वाढवणारे फ्री-रॅडिकल्सदेखील कमी करते. तोंडलीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आढळतात, जे अँटी-इम्फेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्मांनी समृद्ध असतात. ते हृदयाचे संरक्षण करतात.

४. डोळ्यांसाठी फायदेशीर

यातील व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन डोळ्यांसाठी फायदेशीर आहे आणि ते मोतीबिंदूपासून संरक्षण देतात.

मधुमेहाची औषधे घेत असलेल्या व्यक्तींनी संभाव्य परस्पर संवादामुळे मोठ्या प्रमाणात तोंडली सेवन करण्यापूर्वी आरोग्यसेवा प्रदात्याचा सल्ला घ्यावा.

'या' फळभाजीच्या सेवनाने वजन होईल कमी (फोटो : लोकसत्ता ग्राफिक्स टीम)

रोजच्या आहारात आपण अनेक भाज्यांचा समावेश करत असतो. यात फळभाज्यांपासून ते पालेभाज्यांपर्यंत अनेक भाज्यांचा समावेश असतो. सर्वांनाच माहीत आहे की, हिरव्या भाज्या आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तोंडली एक लोकप्रिय भाजीचा प्रकार आहे. तसं तर कच्ची तोंडलीदेखील खाल्ली जातात. या तोंडल्याचे आपल्या शरीरासाठी अनेक फायदे आहेत. परवलसारखी दिसणारी ही फळभाजी किंचित लहान आणि मऊ असते. यामध्ये अनेक पोषक घटक असतात, जे आपल्याला मोठ्या आजारांशी लढण्यास मदत करतात. १०० ग्रॅम तोंडलीच्या सेवनाने तुमच्या शरीरात कोणते बदल घडून येऊ शकतात, याच विषयावर हैदराबाद येथील केअर हॉस्पिटल्सच्या आहारतज्ज्ञ जी. सुषमा यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. सविस्तर माहिती आपण जाणून घेऊ

आहारतज्ज्ञ जी. सुषमा म्हणतात, आपण तोंडलीची भाजी दररोज खात नाही, परंतु तोंडलीची भाजी आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. तोंडलीच्या भाजीच्या चवीपेक्षाही त्यात जीवनसत्त्वाचे खनिज खूप मोठ्या प्रमाणात आहे. १०० ग्रॅम तोंडलीमध्ये सुमारे १.४ मिलीग्राम लोह, ०/०८ मिलीग्राम व्हिटॅमिन बी -२ , ०.०७ मिलीग्राम व्हिटॅमिन-बी १, १.६ ग्रॅम फायबर आणि ४० मिलीग्राम कॅल्शियम असते. तोंडलीमध्ये व्हिटॅमिन ए, बी १, बी २, सी, पोटॅशिअम, मॅग्नेशिअम यांसारखे अनेक पोषक घटक आहेत. तोंडलीचा आकार जेवढा छोटा आहे, तेवढीच तोंडलीची भाजी चवीला खूप चविष्ट असते. तोंडली अनेक आजारांवर फायदेशीर आहे, त्यामुळे आठवड्यातून काही वेळा ते तुमच्या जेवणात समाविष्ट करण्याचे ध्येय ठेवा. तोंडली खाण्याचे फायदे १. पचनप्रक्रिया सुधारते

तोंडलीमध्ये फायबर जास्त प्रमाणात असल्यामुळे ते आपली पचनप्रक्रिया सुधारते, त्यामुळे तोंडली अपल्यासाठी फायदेशीर आहे. रोज तोंडली खाल्ल्याने सिडिटीची समस्या होत नाही, यामुळे आपल्या आहारात तोंडलीचा समावेश करणे खूप गरजेचे आहे. २. वजन कमी करण्यासाठी फायदेशीर


वजन कमी करण्यासाठी तोंडली फायदेशीर आहे. यामध्ये फायबरचे प्रमाण अधिक असते. हे प्रमाण वजन कमी करण्यास उपयुक्त ठरू शकते. तोंडली खाल्ल्याने भूकेवर नियंत्रण येण्यास मदत होते. ३. हृदय राहते निरोगी

तोंडलीमध्ये अनेक पौष्टिक गुणधर्म असतात जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. तोंडली हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी समस्या वाढवणारे फ्री-रॅडिकल्सदेखील कमी करते. तोंडलीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आढळतात, जे अँटी-इम्फेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्मांनी समृद्ध असतात. ते हृदयाचे संरक्षण करतात.४. डोळ्यांसाठी फायदेशीर

यातील व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन डोळ्यांसाठी फायदेशीर आहे आणि ते मोतीबिंदूपासून संरक्षण देतात.

मधुमेहाची औषधे घेत असलेल्या व्यक्तींनी संभाव्य परस्पर संवादामुळे मोठ्या प्रमाणात तोंडली सेवन करण्यापूर्वी आरोग्यसेवा प्रदात्याचा सल्ला घ्यावा.

# गर्भाशयाचा कॅन्सर झाल्याचे ८० टक्के महिलांना समजतच नाही; 'या' सुरुवातीच्या लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नका



कर्करोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी वेळीच निदान आणि उपचार करणे महत्त्वाचे आहे. ओव्हेरियन कॅन्सर म्हणजेच अंडाशयाचा कर्करोग हा जगभरातील महिलांना प्रभावित करणाऱ्या सर्वात घातक कर्करोगांपैकी एक आहे. त्याची चिन्हे आणि लक्षणे वेळीच ओळखून त्वरित उपचार करणे महत्त्वाचे आहे. ओव्हेरियन कॅन्सर भारतातील तिसरा सर्वात सामान्य स्त्रीरोग कर्करोग आहे. पण, लवकर निदान झाल्यास ओव्हेरियन कॅन्सरला हरवण्याची शक्यता वाढते आणि बरे होण्याचे प्रमाण वाढते.

ओव्हेरियन कॅन्सर तेव्हा होतो, जेव्हा अंडाशयातील पेशी वाढू लागतात आणि हळूहळू पसरतात. या प्रक्रियेमुळे कर्करोगाची गाठ तयार होते. हे कोणत्याही वयोगटातील स्त्रियांना प्रभावित करू शकते. परंतु, ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रियांमध्ये याचे निदान केले जाते. स्त्रीरोग ऑन्कोलॉजी, राजीव गांधी कॅन्सर इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली येथील डॉक्टर सारिका गुप्ता यांनी या संदर्भात इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सविस्तर माहिती दिली आहे.गर्भाशयाच्या कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे ओटीपोटात दुखणे: ओटीपोटात तीव्र वेदना होतात, जी मासिक पाळी किंवा पाचन समस्यांशी संबंधित नसतात. महिलांना ओटीपोट सतत फुगल्यासारखे वाटणे किंवा सूज येऊ शकते. यासाठी वैद्यकीय तपासणी आवश्यक आहे वारंवार लघवी होणे : स्त्रियांना सतत लघवीची भावना निर्माण होणे, विशेषतः जर ती कायम राहिली आणि मूत्रमार्गाच्या संसर्गामुळे होत नसली तर त्याकडे दुर्लक्ष करू नका.वजन: वजन कमी होणे किंवा दम लागणे आणि त्यामुळे बहुतेकदा अस्वस्थता वाटू शकते. जर ही लक्षणे तीव्रतेत कोणताही बदल न होता आठवडाभरही टिकून राहिली तर स्त्रीरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या. तरुण स्त्रियांमध्ये प्रमाण अंडाशयाचा कर्करोग तरुण स्त्रियांमध्येदेखील आढळून येतो. पण, लवकर निदान केल्याने तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. अंडाशयाच्या कर्करोगाची वेळीच तपासणी केल्याने उपचार व परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा होते आणि जगण्याचा दर वाढतो. अंडाशयाचा कर्करोगासाठी वय आणि कौटुंबिक इतिहास यांसारख्या काही घटकांवर नियंत्रण ठेवता येत नसले तरी त्याचा धोका कमी करण्यासाठी काही गोष्टींचे पालन करता येऊ शकते काय शस्त्रक्रिया आणि उपचार आवश्यक आहेत ? सर्जिकल व्यवस्थापनाचा भाग म्हणून प्रभावित अंडाशय किंवा दोन्ही अंडाशय काढून टाकणे आवश्यक आहे. त्यानंतर केमोथेरपी आहेत. दुसरा कर्करोगाच्या पेशी ओळखण्यासाठी आणि त्यांना रोखण्यासाठी औषधे वापरतो. गर्भाशयाच्या कर्करोगांपैकी सुमारे २० ते २५ टक्के कर्करोग अनुवांशिक असतात. स्तनाचा किंवा गर्भाशयाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असल्यास, महिलेने सावधगिरी बाळगली पाहिजे.

पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम मुळे गर्भाशयाचा कर्करोग होऊ शकतो ?पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम मुळे गर्भाशयाचा कर्करोग होण्याची शक्यता असते. पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोमच्या तक्रारी आणि संबंधित उपचार सुरु असलेल्या स्त्रियांना ते विकसित होण्याची शक्यता जास्त असते.वेळीच तपासणी महत्त्वाची

गर्भाशयाचा कर्करोग खूप वेगाने विकसित आणि वाढू शकतो, म्हणून स्त्रीरोगतज्ज्ञाच्या क्लिनिकमध्ये पेल्विक चाचणी आवश्यक आहे. नियमित तपासणी करा आणि वेळोवेळी तज्ज्ञांचा सल्ला घ्या. हे लक्षात घेतले पाहिजे की, ही लक्षणे वेगवेगळ्या आरोग्य समस्यांमुळेदेखील उद्भवू शकतात. तुम्हाला या लक्षणांबद्दल चिंता वाटत असल्यास, तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यायला उशीर करू नका. लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळीच निदान आणि उपचारांची निवड करा.

# तुम्ही हळदी दूध प्यावे की हळदीचे पाणी? कोणत्या पेयाचा होतो सर्वाधिक फायदा; घ्या जाणून.

पारंपरिक उपचारपद्धतींमध्ये वर्षानुवर्षे सर्वोत्तम औषधी म्हणून पिवळ्याधमक हळदीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येकाच्या स्वयंपाकघरात उपलब्ध असणारी ही हळद आपल्या आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे हे सर्वांनाच माहीत आहे.

विविध आजारांपासून रक्षण करणारी ही हळद आपल्या संपूर्ण आरोग्याची काळजी घेत असते, असे म्हटले जाते. मात्र, हळदीच्या गुणधर्मांचा शरीरासाठी फायदा करून घेताना दोन गट पडतात. एका पद्धतीत लोक आरामदायी दुधात हळदीचा वापर केल्यास ती जास्त उपयुक्त ठरत असल्याचे मानतात. तर, दुसरीकडे हळदयुक्त पाणी पिणारे लोक त्या पद्धतीवर अधिक भर देतात. त्यामुळे नेमकी कोणती पद्धत अधिक फायदेशीर आहे, असा प्रश्न उभा राहतो. हैदराबादमधील केअर हॉस्पिटल्स, बंजारा हिल्स येथील, क्लिनिकल डायेटिशियन जी. सुषमा यांच्या मते ही निवड प्रत्येक व्यक्ती आणि तिच्या वैयक्तिक गरजांवर आधारित असते. त्यांना कोणत्या पेयातून कोणते फायदे मिळवायचे आहेत हे त्या पेयावर अवलंबून असते, अशी माहिती द इंडियन एक्स्प्रेसच्या एका लेखावरून मिळते. हळदीच्या दुधाचे फायदे – आहारतज्ज्ञ सुषमा यांनी हळदीच्या दुधाचे सांगितलेले फायदे पाहा.अँटीइम्फ्लेमेट्री घटक हळदीमध्ये दाहविरोधक अँटीइम्फ्लेमेट्री गुण असणारा कर्क्युमिन लींर्लीळप नावाचा घटक असतो. त्यामुळे दुधात हळद मिसळून प्यायल्याने संधिवात, सांधेदुखी यांसारख्या दाहसंबंधित आजारावर हे पेय गुणकारी ठरू शकते.

रोगप्रतिकार शक्तीत वाढ हळदीमध्ये भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स असून, त्याचा फायदा रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी होत असतो. त्यामुळे दररोज हळदीचे दूध प्यायल्याने रोगप्रतिकार शक्ती वाढून, शरीर कोणत्याही संसर्ग आणि आजारांना लढण्यासाठी तयार होते.

पचन सुधारण्यास मदत हळद पित्ताशयाला अन्नपचनासाठी आवश्यक असणारे पित्त तयार करण्यासाठी उत्तेजित करते. त्यामुळे हळदीचे दूध हे अपचन, पोट फुगणे, गॅस यांसारख्या पचनासंबंधी समस्या दूर करण्यास मदत करू शकते. उत्तम झोपेसाठी मदत कोमट दूध त्याच्या आरामदायी गुणधर्मासाठी ओळखले जाते. दूध जेव्हा हळदीसह एकत्रित केले जाते, तेव्हा शरीराला अधिक आराम मिळतो. त्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारण्यास फायदा होतो. कर्करोग प्रतिबंधक हळदीमध्ये असणाऱ्या कर्क्युमिनचा फायदा हा कर्करोग प्रतिबंधित करण्यासाठीही कदाचित फायदेशीर ठरू शकतो , असे आहारतज्ज्ञ सुषमा यांनी सांगितल्याचे द इंडियन एक्सप्रेसच्या लेखावरून समजते. कर्क्युमिनमध्ये कर्करोगाविरुद्ध लढण्याचे गुणधर्म असू शकतात, असे काही अभ्यासातून समोर आल्याचे त्या म्हणतात.

# कर्नाटक राज्यातील बीदर जवळील संतपूर शहरात भारतीय भीम सेनेचा वर्धापनदिन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव संपन्न

बीदर /संतपूर : – राज्यातील बीदर जवळील संतपूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३३ वी जयंती आणि भारतीय भीम सेनेच्या ५६ व्या वर्धापनदिनानिमित्त ३० एप्रिल २०२४ ला विशेष विचार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.*





याप्रसंगी महादेव कांबळे म्हणाले की, जयंती साजरी करणे हा आपला उद्देश तर आहेच पण आदर्श महापुरुषांचे आंदोलन चालविणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आंदोलन चालविणे हे सुखोपभोगी अय्याशी लोकांचे काम नाही. निवडणूकीच्या काळात सुद्धा परिवर्तनवादाचा बाऊ करणारे लोक गांधींचे आंदोलन चालविताना दिसतात, ही मूल भारती समाजाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना दि आल इंडिया नाग असोसिएशन (आईना) चे नॅशनल कौन्सिल मेंबर बी. बी. मेश्राम म्हणाले की, आपण फारच विपरीत परिस्थितीत अशा देशात जीवन जगत आहोत, ज्या देशातील बहुसंख्याक लोकांवर अल्पसंख्याक समुदायाचे लोक राज्य करीत आहेत. हे कसे काय शक्य आहे? याचे आकलन होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने विचार करता एका काळात मान्यवर कांशीराम यांनी बहुजन समाजातील आंदोलन चालविण्यासाठी तत्कालीन परिस्थितीत तिलक, तराजू और तलवार इनको मारो जाते चार, जिनकी जितनी संख्या भारी, उनकी उतनी भागीदारी. असे नारे दिले होते. त्याचप्रमाणे बी. श्यामसुंदर यांनी त्या काळात, बनिया को लुटो, बामन को काटो और गरिबों में बाटो. असा नारा दिला होता. याची जाणीव ठेवून बी. श्याम सुंदर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ७७ व्या जयंती समारंभात २९ एप्रिल १९६८ ला भारतीय भीम सेनेची स्थापना केली होती. हा इतिहास समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. करिता बी. श्यामसुंदर यांच्या जयंती निमित्त २१ जानेवारी २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल च्या माध्यमातून विशेष प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करून हा विषय समजून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत, ज्याला प्राचार्य विठ्ठल दास प्यागे सरांनी सविस्तर मार्गदर्शन केले होते. तसेच हैदराबादी आंबेडकर बी. एस. व्यंकटराव यांच्या कार्यप्रणाली ला सुद्धा समजून घेणे आवश्यक आहे.

आजच्या कार्यक्रमातील महिलांची लक्षणीय उपस्थिती म्हणजे पुरुषांच्या दहापट बघितल्यावर क्रांतीची सुरूवात झालेली आहे, याची ग्वाही द्यायला हरकत नसावी, असे मला वाटते. कारण २० जुलै १९४२ ला नागपूर येथील परिषदेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, फक्त पुरुषांच्या तुलनेत महिलांचा आंदोलनात सहभाग असल्यास होणारी क्रांती अर्ध्या कालावधीत होईल. तो काळ जवळ येत आहे. आपण बहुतांश महिला कार्यक्रमात उपस्थित असल्याने मी आपणास जाणीव करून देऊ इच्छितो की, युपीएससी चे माजी चेअरमन एम. एल. शहारे यांचे वडील बाजारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असे छायाचित्रे विकत आणायचे ज्या प्रतिमेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळविलेल्या सर्व म्हणजे बी. ए, एम. ए., पीएच. डी., डी एस्सी, एल एल डी, डी. लिट्ट, बार–अट–ला, इत्यादी पदव्या लिहिलेल्या असायच्या यासाठी की, त्यातून मुलांना प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा होती. ज्या अपेक्षापूर्ती च्या अनुषंगाने पुढे जाऊन एम. एल. शहारे साहेब युपीएससीचे चेअरमन होऊ शकले. म्हणून मी तुम्हांला विनंती करतो की, आपण ही तशी कृती करावी. जेणेकरून आपले अपत्य मोक्याच्या व मा–याच्या जागा मिळवू शकतील.

एका काळात बी. श्यामसुंदर सरोजिनी नायडू यांच्या नेतृत्वाखालील स्वदेशी लीगचे महासचिव होते. जेव्हा महात्मा गांधींनी सरोजिनी नायडू यांच्या घरी बैठकीचे आयोजन केले होते. त्यावेळी हरिजन शब्दावरून शाब्दिक चकमक झाली आणि गांधीं उच्च वर्णियांसाठी कार्य करीत असल्याची जाणीव झाल्याने बी. शामसुंदर यांनी स्वदेशी लीग चा त्याग केला. यातून आपण धडा घेऊन मार्गक्रमण केले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रानडे, गांधी आणि जीना या चर्चेत संदेश दिला आहे की, समाजातील संस्था, संघटना समोर अधोगतीची अशी स्थिती समाजात येईल जेव्हा जुने मार्ग, जुने विचार आणि जुन्या सवयी समाजाच्या उत्कर्षासाठी असफल ठरतील. ज्यामुळे आपले अस्तित्वच संपुष्टात येईल. अशावेळी आपण नवे विचार, नवे मार्ग आणि नव्या सवयी शोधल्या पाहिजेत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभे पासून स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन ते प्रस्तावित रिपब्लिकन पक्षाची मांडणी केली होती. म्हणजे कालानुरूप पक्ष, संघटनात बदल केल्याचा इतिहास आपल्या समोर उपलब्ध आहे. आपण ज्या कुठल्या पक्ष, संघटनेत कार्य करीत आहात त्या समाजाच्या उत्कर्षासाठी लाभदायक ठरत नसतील तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गावर चालले पाहिजे. याचा आढावा घेतला असता समाज जीवनात सर्व क्षेत्रात नेतृत्वाची निर्वात पोकळी निर्माण झाल्याने नेतृत्वहीन समाजात नेतृत्व प्रदान करण्याची भाषा बोलणारे जेव्हा नेतृत्वहीन झालेत याची जाणीव झाल्यावर पर्यायी, वैकल्पिक व्यवस्था निर्माण व्हावी म्हणून आम्ही राष्ट्रीय स्तरावर दि आल इंडिया नाग असोसिएशन अर्थात आईना (–खछ–) ची स्थापना केली आहे. ही देशातील महान घटना आहे. ज्यात सर्व स्तरातील नाग लोकांना सामावून घेतले जाणार आहे. यामागील भूमिका आणि मर्म समजून घेतले पाहिजे, अशी मी आपण सर्वांना अपील करतो. जेणेकरून आपण सत्याचे समर्थन करावे आणि असत्याचा प्रतिकार करावे. ही माझी आपण सर्वांना नम्र विनंती आहे. परिणामी आपण आपल्या आदर्श महापुरुषांच्या आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समर्थ ठरुया. उमा चव्हाण यांनी अध्यक्षांनी व्यक्त केलेल्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आश्वासन दिले. याप्रसंगी गीता पाटील, प्राचार्य विठ्ठल दास प्यागे, शामसुंदर खानापूरकर, काशीनाथ गायकवाड यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधामती गुप्ता तर अशोककुमार माळगे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दुष्काळात तेरावा : शेतकऱ्यांना बसणार मोठा आर्थिक फटका रासायनिक खतांच्या किमतीत पुन्हा वाढ !

किनवट.प्रतिनिधी. (शेख शौकत) : आगामी खरीप हंगामापूर्वीच रासायनिक खताच्या भावात मोठी वाढ झाल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार असून शेतमालाच्या उत्पादन खर्चात वाढ होणार आहे. शेती उत्पादनासाठी रासायनिक खत अनिवार्य असल्याने शेतकऱ्यांच्या व्यवहारात रासायनिक खताच्या किमती महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यात गेल्या काही वर्षांत सततची वाढच होत असल्याने शेतकऱ्यांचे अर्थशास्त्र बिघडत असल्याची स्थिती आहे.



तालुक्यासह जिल्ह्यात खरिपाची पेरणी जून महिन्यात होत असली तरी मे महिन्यापासूनच खताची खरेदी होते. शिवाय उसासाठी बेसळ डोस देणे आवश्यक असल्याने खताची आतापासूनच मागणी होत आहे. भावात मोठी वाढ झाल्याने आर्थिक झळ बसणार आहे. मिश्र खते, सुपर, पोटॅश यांच्या भावात वाढ झाली. डिझेल दरवाढ झाल्याने ट्रैक्टरमार्फत होणारी शेती आंतरमशागतीचा खर्च वाढला आहे. प्रतिएकर तीनशे रुपयापर्यंत नांगरणीचा खर्च वाढला असून २ हजार रुपये प्रतिएकर नांगरणी झाली आहे. तिरी पाळीसाठी एकरी दीडशे ते दोनशे रुपये अधिकचा खर्च करावा लागत आहे. शिवाय सोयाबीन काढणीचे दरही पाच हजार रुपये प्रति एकर झाल्याने शेतीचे बजेट बिघडणार आहे. उत्पादन खर्चात वाढ होत असताना शेतमालाच्या बाजारभावात मात्र घट होत आहे. यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. उत्पादन खर्चात सर्वात महत्त्वाचा घटक असणाऱ्या खताच्या भावातच वाढ होत असल्याने शेती क्षेत्र आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील खतांच्या वाढत्या किमतीचा परिणाम आपल्या देशात दिसून येतो. युरिया साधारणपणे १५ ते २० टक्के, पोटॅश १०० टक्के, सुपर फॉस्फेट ६० ते ७० टक्के बाहेरील देशातून आयात केले जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खतांच्या किमती वाढल्याचा परिणाम देशात जाणवतो. आर्थिक गणित कोलमडणार खत, बियाणे, रोजगार, अन् मशागतीसाठी लागणारे यंत्र याच्या बाजारभावात नियमित वाढच होत आहे. मात्र शेतमालाचे बाजारभाव स्थिर अन् घटतेच आहेत.

गेल्या दोन वर्षांपासून सोयाबीनचे बाजारभाव पाच। हजाराभोवतीच आहेत. सध्यस्थितीत तर ४ हजार ६०० रुपये भावामुळे अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्री न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतमालाचे बाजारभाव घटणारे अन् खर्च मात्र वाढतच असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडत असल्याचे चित्र आहे.

# बार्टीकडून स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद वाक्य महान समाज सुधारक शिक्षण प्रसारक रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन

वसमत :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था प्रकल्पा अधिकारी सिद्धार्थ गोवदे यांच्या मार्गदर्शक समतादूत मिलिंद आळणे,गुरूनाथ गाडेकर सर्वप्रथम कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले



अध्यक्षस्थानी मदन जी भोसले हे होते प्रमुख पाहुणे रजनीकांत कमळू हे होते सर्वसामान्य जनतेपर्यंत शिक्षणात प्रसार करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना भाऊराव आणि मागास व गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून कमवा व शिका ही योजना सुरू करून मोठे काम बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसारकरताना विद्यार्थ्यांमध्ये बंधुता व समता रुजावी यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणातून समता व बंधुता यांचे संस्कार विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला भाऊरावांनी केवळ क्रमिक शिक्षण नव्हे ,तर समता, बंधुता ,श्रमप्रतिष्ठा सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना दिली. यावेळी उपस्थित करण जाधव ,देसाई सर,रघुनाथ कदम अकोलीकर ,अंभोरे मामा ,शुभम कदम, क्षितिज मेकाने ,विठ्ठल पडोळे, मदन जी भोसले आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते .आभार प्रदर्शन मिलिंद आळणे यांनी केले

# लातूर लोकसभा मतदारसंघात १२ लाख ३७ हजार ३५५ मतदारांनी बजाविला हक्क

लातूर :– लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर मतदारसंघात १९ लाख ७७ हजार ४२ मतदारांपैकी १२ लाख ३७ हजार ३५५ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला. त्यामुळे जिल्ह्यात ६२.५९ टक्के मतदान झाल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी सांगितले. तसेच सर्व मतदान यंत्रे लातूर येथील शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतनमधील सुरक्षा कक्षात ठेवण्यात आली असून याठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. लातूर लोकसभा मतदारसंघ अंतर्गत येणाऱ्या लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात ३ लाख २४ हजार ३०३ मतदारांपैकी २ लाख ११ हजार ७११ मतदारांनी म्हणजेच ६५.२८ टक्के मतदारांनी मतदान केले. लातूर शहर विधानसभा क्षेत्रातील ३ लाख ८४ हजार ९८० मतदारांपैकी ६०.७७ टक्के म्हणजेच २ लाख ३३ हजार ९३४ मतदारांनी आपला हक्क बजाविला. अहमदपूर विधानसभा क्षेत्रात ३ लाख ३८ हजार ६१४ मतदारांपैकी २ लाख १३ हजार ७२६ मतदारांनी (६३.१२ टक्के), उदगीर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात ३ लाख १२ हजार ८६५ पैकी १ लाख ९८ हजार ६२ मतदारांनी (६३.३१ टक्के), निलंगा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील ३ लाख २२ हजार ७२८ मतदारांपैकी २ लाख १४६ मतदारांनी (६२.०२ टक्के) आणि लोहा विधानसभा क्षेत्रातील २ लाख ९३ हजार ५५२ मतदारांपैकी १ लाख ७९ हजार ७७६ म्हणजेच ६१.२४ टक्के मतदारांनी मतदान केले. मतदारसंघातील एकूण १० लाख ३५ हजार ३७६ पुरुष मतदारांपैकी ६ लाख ६४ हजार ६३० पुरुष मतदार (६४.१९ टक्के), ९ लाख ४१ हजार ६०५ महिला मतदारांपैकी ५ लाख ७२ हजार ७०० महिला मतदारांनी (६०.८२ टक्के) आणि ६१ तृतीयपंथी मतदारांपैकी २५ मतदारांनी (४०.९८ टक्के) आपला हक्क बजाविला.

# माफसुने कमर्शियल मिनरल मिश्रण माफसू मिन लॉंच केले

नागपूर :– महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी नुकतेच व्यावसायिक खनिज मिश्रण माफसु मिन लॉंच केले. जागतिक पशुवैद्यकीय दिनानिमित्त नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे आयोजित राष्ट्रीय वैज्ञानिक चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमात खनिज मिश्रणाचा शुभारंभ माफसुचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, श्री एस. रेगुपती, कार्यकारी संचालक, एनडीडीबी, आनंद यांच्या उपस्थितीत डॉ. शिरीष उपाध्ये, अधिष्ठाता (पशुविज्ञान); डॉ. नितीन कुरकुरे, संचालक संशोधन; डॉ. अनिल भिकाने, संचालक विस्तार; डॉ. सचिन बोंडे, अधिष्ठाता (मत्स्यविज्ञान); डॉ. सोमकुवर, सहयोगी अधिष्ठाता; डॉ. डी. व्ही. कोलते, संचालक, वेंको संशोधन आणि प्रजनन फार्म; डॉ. सतीश राजू, प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन; डॉ.







अजय पोहरकर, अध्यक्ष, एमएसव्हीसी. माफसुने डॉ. नितीन पाटील यांच्या नेतृत्वाखाली आपले पहिले व्यावसायिक उत्पादन माफसु मिन लॉंच केले आहे. हे नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयातील पशुपोषण विभागाद्वारे उत्पादित केले असुन पशुपालकांसाठी स्वस्त दरात उपलब्ध आहे, ज्यामुळे प्रदेशातील पशुधनाची प्रजनन क्षमता, प्रतिकारशक्ती आणि उत्पादन सुधारण्यास मदत होईल. कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी प्रमुख अन्वेषक डॉ. अतुल ढोक व त्यांच्या चमूस यशस्वितेकरीताअभिनंदन केले.

# मराठवाड्यात अवकाळी पावसाच्या सरी

छत्रपती संभाजीनगर : राज्यातील कोकण वगळता इतर विभागातील बहुतांश जिल्ह्यात अवकाळी पावसाचे आगमन झाल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस किंवा मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या ताज्या अंदाजानुसार, आज ९ मे रोजी मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. त्यानुसार पुणे, संभाजीनगर, हिंगोली, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली आहे. यावेळी सोसाट्याचा वाराही वाहताना पाहायला मिळाला. हवामान खात्याचा अंदाज खरा ठरला असून अनेक भागांत पावसाचे आगमन झाले आहे. पुण्यातील सिंहगड रोडवरही जोरदार धारा कोसळल्याचे पाहायला मिळाल. नांदेड सिटी, धायरी, बावधन, कात्रजघाट हायवे मार्गावर मुसळधार पाऊस झाला. तर, आंबेगात ते सिंहगड रोडवर हवामान खात्याने सांगितलेल्या अंदाजानुसार कालपासूनच यवतमाळ जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते. तर दुपारच्या सुमारास यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी, दारव्हा, दिग्रस, पुसद, महागाव, नेर या तालुक्यांमध्ये वादळी वा–यासह विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. जिल्ह्याचे तापमान हे ४२.५ अंशांवर गेले असता अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. या पावसामुळे उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. सध्या खरीप हंगामातील मशागतीच्या कामाला लागला असल्याने या पावसामुळे शेतक–यांना दिलासा मिळाला आहे. मात्र, अवकाळी पावसामुळे पालेभाज्या आणि फळबागांचे नुकसानही होत आहे. चंद्रपूर शहर आणि जिल्ह्यातही आज मुसळधार पावसाने हजेरी लावली. सलग दोन दिवस चंद्रपुरात मुसळधार पाऊस अनुभवला जात आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE